Website

Anekant Education Society's
**Tuljaram Chaturchand College, Baramati**

# Notice

**Notice No. 268** **Displayed on : 27/02/2018**

## सर्व ई.बी.सी धारक विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची सूचना

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना सन २०१७–१८ ऑफलाईन अर्ज

## ( फक्त सिनीयर कॉलेज अनुदानित व विनाअनुदानित विद्यार्थ्यांसाठी)

### बी.ए. /बी.कॉम./बी.एस्सी./बी.बी.ए/बी.सी.ए./बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स/बी.व्होक/एम.ए/एम.कॉम./एम.एस्सी. ( सर्व )

### (जात प्रवर्गाचे विद्यार्थी सोडून)

**शासनाच्या नवीन धोरणानुसार** राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना शै. वर्ष २०१७–१८ करीता अनुदानित व विनाअनुदानित कोर्सेसच्या विद्यार्थ्यांनी ऑफलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी ऑफलाईन शिष्यवृत्तींचे अर्ज महाविद्यालयात **दि. ०३/०३/२०१८** पर्यंत प्रशासन भवन स्कॉलरशिप विभागात जमा करावा.

अटी व शर्ती –

१. शिष्यवृत्तीच्या अर्जासोबत जोडावयास सांगण्यात आलेले सर्व आवश्यक कागदपत्रांची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तींची रक्कम आधार संलग्नित खातेवर थेट जमा करण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी अर्जामध्ये बॅकखाते बाबत माहिती तसेच आधार क्रमांकाची माहिती अचूक भरावी. तसेच आपल्या बॅकेच्या पासबूकाची प्रथम पृष्ठाची छायांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

४. अपूर्ण/चुकीची माहिती भरलेला अंतिम मुदतीनंतर प्राप्त अर्जाचा शिष्यवृत्तीसाठी विचार केला जाणार नाही.

५. शिष्यवृत्तीसाठी अर्ज केला म्हणजे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळेलच असे नाही. शासनाने वेळोवेळी निश्चीत केलेल्या अटी व शर्ती पूर्ण करणारे विद्यार्थीच

शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरतील.

६. सदर योजनेचा लाभ हा कुटुंबातील केवळ दोन अपत्यांना मिळेल.

७. या योजनेचा लाभ दूरस्थ पध्दतीने (Open/Distance/Virtual Learning) अथवा अर्धवेळ (Part-Time) स्वरुपात चालविल्या जाणा–या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा–या विद्यार्थ्यांना मिळणार नाही.

८. शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांपैकी केवळ कोणत्याही एकाच योजनेंतर्गत लाभ मिळण्यास संबंधित विद्यार्थी पात्र असेल.

९. या योजनेकरिता पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. ८,००,०००/– पर्यंत असावे.

**<u>ऑफलाईन फॉर्म सोबत जोडावयाची कागदपत्रे –</u>**

१. मागील वर्षाच्या मार्कशिटची झेरॉक्स प्रत.

२. सन २०१६–१७ चा मा. तहसिलदारांचा उत्पन्नाचा दाखल्याची झेरॉक्स प्रत.

३. डोमासाईलची (अधिवास प्रमाणपत्र) झेरॉक्स प्रत.

४. आधारकार्डची झेरॉक्स प्रत.

५. बॅंक पासबुकची झेरॉक्स प्रत.

६. आधार लिंकींग पावती झेरॉक्स प्रत.

७. शैक्षणिक शुल्क व परिक्षा शुल्क चलनाची झेरॉक्स.

८. रेशनकार्ड झेरॉक्स.

९. शै.गॅप असेल गॅप ॲफिडेव्हीट.

**ऑफलाईन फॉर्म विद्यार्थ्यांना विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडारामध्ये मिळेल. <u>विद्यार्थ्यांनी ऑफलाईन अर्ज भरला नाही तर होणा–या आर्थिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.</u>**

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

रजिस्ट्रार
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती.

प्राचार्य
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती.